# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

**प्रशासन शिक्षकेतर कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
दूरध्वनी क्र. : ०२०-२५६२१०८०/८२/७६
ईमेल आयडी : adminnt@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**Administration Non-Teaching**
Ganeshkhind, Pune 411 007
Phone No.: 020- 25621080/82/76
Email Id.: adminnt@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र.एएन/ 1655 दिनांक : 22 MAY 2025

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग

**विषय :- दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ या कालावधीतील गोपनीय अहवालांबाबत...**

**संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०७/०२/२०१८**
**२) परिपत्रक क्र. ८६/२०२५, दिनांक ०१/०४/२०२५**
**३) एएन/११३२, दिनांक ०२/०४/२०२५**
**३) एएन/१४४२, दिनांक २९/०४/२०२५**

महोदया/महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वर्ग-१ ते वर्ग-३ मधील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कार्यमुल्यमापनाबाबत शासनाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत. याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये अहवाल भरण्यासंबंधी सूचना व कार्यमुल्यमापनाचा अहवाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सुधारित शासन निर्णयानुसार संबंधित अधिकारी/सेवकांची प्रपत्र-१ मधील माहिती प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडून पूर्वीप्रमाणेच भरण्यात आलेली आहे. भाग-२ मधील माहिती ही संबंधित अधिकारी व सेवकांच्या स्वयंमूल्यनिर्धारणाबाबत अधिकारी/सेवक यांनी प्रत्यक्ष भरावयाची आहे. वर्ग-१ ते वर्ग-३ मधील कर्मचा-यांनी त्यांचे गोपनीय अहवाल ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाचे आहेत. आपल्या विभागामध्ये उपरोक्त कालावधीमध्ये कार्यरत असणा-या सेवकांच्या मूल्यमापनाचा अहवाल आपण भाग-३ मध्ये ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे.

सर्व शिक्षकेतर कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून संबंधितांनी त्यामध्ये दिलेल्या सूचनांनुसार अहवाल योग्यरीतीने भरावयाचा आहे. मा.विभागप्रमुखांनी सदर अहवालांबाबत आपले अभिप्राय मुल्यांकनाच्या आढाव्यात प्रतिवेदन अधिकारी म्हणून ऑनलाईन पध्दतीने नोंदवयाचे आहेत.

अस्थायी कर्मचा-यांची सेवा १ वर्ष कालावधीकरिता असेल व अशी सेवा पुढे चालू राहण्याची शक्यता असेल तर त्यांचे गोपनीय अहवाल लिहावेत. त्याचप्रमाणे प्रतिवेदन अधिका-याने/पुनर्विलोकन अधिका-याने संबंधित कर्मचा-यांचे/अधिका-यांचे काम प्रतिवेदन वर्षात ३ महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी पाहिले असेल तर गोपनीय अहवाल लिहू नयेत.

सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना विनंती की, आपल्या विभागातील **सर्व संबंधित अधिकारी/सेवकांचे गोपनीय अहवाल लिहिण्याचा/भरण्याचा अंतिम दिनांक १६ मे, २०२५ पर्यंत संदर्भ क्र. २ व ४ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि सदरचे गोपनीय अहवाल भरण्यासाठी दिनांक १७ मे, २०२५ ते दिनांक ३१ मे, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(प्रशासन शिक्षकेतर कक्ष)

**टिप :** शासन निर्णय क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०७/०२/२०१८ ची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

E:\Admin Data\Confidential Report Circular\CR letter to HOD.doc